~~२२८~~ ~~२७८~~ ~~२२८~~ -२२१-

-२२८ विषय: लष्करी विमानतळाचे परिसरात अकृषिक परवानगी नाकारणे बाबत सूचना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
क्र. एनएए १०८६/७७३/सीआर-२९/ल-२
दिनांक: १२ /५/१९८६.

परिपत्रक

म.ज.म.अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ अन्वये शेतजमीन अकृषिक प्रयोजनासाठी वर्ग करण्यास जिल्हाधिकारी यांचेकडे विहीत अर्जावरहुकूम संबंधिताना परवानगीसाठी अर्ज करावा लागतो. सदरहू अर्ज प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी त्या प्रकरणी संबंधित अधिका-यांमार्फत सविस्तर चौकशी करून व नियमास अधीन राहून काही अटी व शर्तींवर अकृषिक परवानगी देत असतात. परंतू ज्यावेळी काही जागा शासनाला त्यांच्या योजनासाठी आवश्यक असतात अथवा सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता आणि सुखसोयी यांच्या दृष्टीकोनातून राखून ठेवणे आवश्यक असते अशा वेळी जिल्हाधिकारी संबंधितांना म.ज.म.अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ [२] [क] प्रमाणे लेखी कारणे देऊन तशी परवानगी नाकारु शकतात.

२. लष्करी विमानतळाजवळ अथवा त्यांचे परिसरामध्ये खाजगी भूखंडधारकांना शेतजमिनीचा अकृषिक वापर करण्यास परवानगी देण्यात येऊ नये, अशी लष्करी अधिका-यांची सूचना आहे. लष्करी टापूमधील प्रतिबंधक भागामध्ये सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने त्याची नितांत आवश्यकता असते. तरी लष्करी प्राधिकरण अथवा संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचेशी सल्ला मसलत केल्याशिवाय लष्करी विमानतळाच्या प्रतिबंधक क्षेत्रामध्ये आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये जिल्हाधिकारी यांनी कोणत्याही प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी देण्याची कार्यवाही करु नये असे शासनाचे आदेश आहेत.

३. हया आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

कारी रत्नागिरी
कार्यालय
MAY1986